पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

महाराष्ट्र पोलीस — सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७५७ /२०२३ दि. १६/०९/२०२३

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे शहरात वागळे वाहतुक उप विभागाचे हद्दीत दि. १९/०९/२०२३ ते २८/०९/२०२३ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. २०/०९/२०२३ (दिड दिवसांचे), दि. २३/०९/२०२३ (गौरी गणपती विसर्जन पाच दिवसाचे), दि. २५/०९/२०२३ (सात दिवसांचे) दि. २८/०९/२०२३ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत विसर्जनाचे मार्गावरील वाहतूक सुनिश्चित व सुरक्षीत राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद–** १) वागळे इस्टेट, रोड नं. १६ कडून मॉडेला नाक्याकडे जाणाऱ्या टि.एम.टी बसेससह सर्व प्रकारच्या वाहनांना रोड नं. १६ पेट्रोल पंप येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने वागळे इस्टेट व रोड नं. १६ कडुन मॉडेला नाका मुंबईकडे जाणारी वाहने रोड नं. १६ येथुन डावीकडे वळुन ॲग्रीकल्चर ऑफीस–ब्राडमा कंपनी–कामगार हॉस्पीटल समोरून–ई.एस.आय.एस. हॉस्पिटल रोडने नितीन जंक्शन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) बेस्ट बसेस मॉडेला चेक नाका मार्गे तिनहात नाका येथे वळण घेवून जाणाऱ्या बसेसना मॉडेला चेक नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरच्या बसेस मुलुंड चेक नाका येथेच प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी घेवून मुंबई कडे जातील.

**नो पार्कींग झोन–** ३) स.गो. बर्वे मार्ग, शांताराम चव्हाण मार्ग, रोड नं. २२ सर्कल–इंदिरानगर नाका व इंदिरानगर नाका–नितीन जंक्शन या रोडवर दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना पार्कीग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद–** ४) देवदयानगर नाका/क्रॉस येथुन उपवन तलावाकडे जाणाऱ्या टि.एम.टी. बसेससह सर्व प्रकारच्या वाहनांना येऊर गेटपर्यत प्रवेश बंद असुन पुढे मुख्य दुतर्फा रस्त्याने उपवन तलावाकडे जाण्यास **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** देवदयानगर क्रॉस /नाका येथुन उपवन तलाव /गावंडबाग पोखरण नं. २ विभागाकडे जाणारी वाहने मत्रांजली बंगला – निळकंठ हाईट्स मार्गे मुख्य रस्त्याने पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ५) कृत्रिम उपवन तलाव/पायलादेवी मंदिर प्रवेशद्वार/गावंडबाग कडुन येऊर गावाकडे उपवन मार्गे जाणाऱ्या दुतर्फा रस्त्याने टीएमटी बसेससह सर्व वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** कृत्रिम उपवन तलाव/पायलादेवी मंदिर प्रवेशद्वार/गावंडबाग कडुन येऊर गावाकडे जाणारी वाहने निळकंठ हाईट्स मार्गे देवदयानगर नाका/क्रॉस – शिवाईनगर सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसचुना ही दि. १९/०९/२०२३ ते २८/०९/२०२३ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. २०/०९/२०२३ (दिड दिवसांचे), दि. २३/०९/२०२३ (गौरी गणपती विसर्जन पाच दिवसाचे), दि. २५/०९/२०२३ (सात दिवसांचे) दि. २८/०९/२०२३ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत सकाळी १०:०० वा. पासून गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहिल.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलिस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी,ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका,ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रतः– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.